रेग्युलर कज्जा क्रं.२०१/२०१० मधील निशाणी ३५ वरील आदेश.
**(CNR NO.MHKO07-001060-2010)**

१. प्रस्तुत अर्ज वादीने या दाव्याच्या कामी सी.पी.सी. ऑर्डर १ रुल १०(२) प्रमाणे सौ.चंचला वैभव पाटील यांना प्रतिवादी क्रं.८ म्हणून सामील करुन घेणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व कायम मनाईसाठी प्रतिवादी विरुध्द दाखल केला आहे. प्रतिवादी क्रं.१,३,४ व ५ व प्रतिवादी क्रं.७ यांनी म्हणणे व कैफियत दिली असून प्रतिवादी क्रं.७ यांनी त्यांचे कैफियत मधील कलम १४ मध्ये चंचला हिला सामाविष्ट केले नसलेची तक्रार घेतली आहे. वास्तविक चंचला हिला दावा मिळकतीमध्ये कायदयाने हिस्सा येत नसल्याने तिला पक्षकार केलेले नव्हते. तथापी तांत्रिक अडचण राहु नये व दावा हा गुणदोषावर निर्णय होणेकामी सौ.चंचला वैभव पाटील यांना पक्षकार करणे जरुरीचे आहे. तरी, सौ.चंचला वैभव पाटील यांना याकामी प्रतिवादी नं.८ म्हणून सामील करणेत यावे ही विनंती केली असे.

३. प्रतिवादी तर्फे सदरचे अर्जावर आपले म्हणणे दिलेले नसलेने त्यांचेविरुध्द " नो से " चा आदेश दि.०९.११.२०१७ रोजी झालेला आहे.

४. अर्जाचे अवलोकन केले. वादीचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा हा वडीलोपार्जित मिळकतीच्या व एकत्रकुटबीचे मिळकतीच्या वाटपासाठी पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादी क्रं.७ यांने नि.२६ ला कैफियत देवून वादी यांने दाव्यात आवश्यक सर्व पक्षकार केले नसल्याचा मुद्दा उपस्थीत केला आहे व त्या अनुषगांने वादी याने प्रस्तुतचा अर्जान्वये सौ.चंचला वैभव पाटील पक्षकार करण्याबबत विनंती अर्ज केला आहे. अशा परिस्थीतीत दाव्याचा विषय पाहता प्रस्तुत सौ.चंचला वैभव पाटील यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करणे हे वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद अंतिमरित्या निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे असे दिसून येते. सौ.चंचला वैभव पाटील यांना दाव्यात

पक्षकार केल्याने दाव्याच्या अंतीम गुणावगुणावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक नाही हे संमत न्यायतत्व आहे. सौ.चंचला वैभव पाटील यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार केल्याने दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास कोणतीही नवीन केस अथवा दावा निर्माण होत नसुन दाव्याचे स्वरुप बदलत नाही. उलटपक्षी सदरहू दुरुस्तीमुळे प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती याचा विचार करता माझे मते मागणी केलेली दुरुस्ती मंजुर केल्यामुळे पक्षकारांमधील खराखुरा वादातीत प्रश्न अंतीमरित्या निर्णीत करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींना नुकसान पोहोचत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करतोः-

| | आदेश | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. | |
| २ | वादींनी आजपासून १४ दिवसात दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्त करुन दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी. वादीने विहीत मुदतीत दुरुस्ती न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा. | |
| ३ | वादींनी आदेशाची पुर्तता केल्यानंतर नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या प्रतिवादींना दावे कामी समन्स काढण्यात यावेत. | |

सही/-
(विश्वास पां.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.

ठिकाणः-जयसिंगपूर.
दिनांकः-२१/०१/२०१९.